# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, पुणे, सातारा, रत्नागिरी

R.N.I. No. MAHMAR/2010/33301

● वर्ष : ९ ● अंक: ४ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार २४ एप्रिल २०१८ ते सोमवार ३० एप्रिल २०१८

मूल्य २/- रुपये

Website:maharashatracrimetimes.com Email-maharashtracrimetimes33301@gmail.com POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2017-2019


3 | २६ गावांचा 'बुलेट ट्रेन'ला विरोध

१९ वर्षीय मराठी तरुण जैन धर्माची दिक्षा घेणार! | 4

## थोडक्यात महत्वाचे

### कांदिवली शिवसेनेचे उपशाखाप्रमुख सचिन सावंत यांची हत्या

मुंबई (सम्यक कासारे)- शिवसेनेचे उपशाखा प्रमुख सचिन सावंत यांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली. रात्री ८ च्या सुमारास ही घटना घडली.



कांदिवली ईस्ट च्या आकुर्ली रोडवर रात्री ही घटना घडली. बाईकवर आलेल्या दोन हल्लेखोरांनी सावंत यांच्यावर गोळीबार केला. घटनेनंतर गंभीर जखमी झालेल्या सावंत यांना कांदिवलीच्या शताब्दी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आलं होतं मात्र त्या आधीच त्यांचा मृत्यू झाला होता. व्यावसायीक वादातून ही हत्या झाली असावी असा प्रार्थमीक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

### परभणीत ७ वर्षाच्या मुलीचं अपहरण करून बलात्कार

परभणी (प्रतिनिधी)- देशात सध्या सर्वत्रच लहान मुलींवर अत्याचार प्रकरणात वाढ झालीय. परभणीतही एका ७ वर्षाच्या चिमुकलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार केला गेल्याचा उघड झालं आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली आहे.परभणी तालुक्यातील वांगी येथील शेतकरी कुटुंब शहरात खरेदी करण्यासाठी गेले होते. तेव्हा जुन्या परिचित असलेल्या सय्यद बबलूअशरफ या ३५ वर्षाच्या इसमाने त्यांच्या कुटुंबातील ७ वर्षाच्या चिमुकलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार केला. या प्रकरणी १८ एप्रिल रोजी नानल पेठ पोलीस ठाण्यात पॉस्को कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.



# ५० वर्षे सत्तेत राहण्याचं स्वप्न पाहा

## अमित शाहांचा कार्यकर्त्यांना सल्ला

गाझियाबाद (वृत्तसंस्था)- भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अमित शाह यांनी रविवारी गाझियाबाद येथील सभेत कार्यकर्त्यांना कानमंत्र दिला आहे.आगामी ५० वर्षात सत्तेत राहण्याचं स्वप्न पाहा, असं आवाहन अमित शहा यांनी कार्यकर्त्यांना केलं आहे.'निवडणुकीतील विजयाची कल्पना ही केवळ पाच वर्षे, दहा वर्षे, १५ वर्षे करु नका, तर ५० वर्षे सत्तेत राहण्याचा संकल्प करा. ज्याप्रमाणे काँग्रेसने देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून प्रदीर्घकाळ ग्रामपंचायत ते संसदेचं लक्ष्य डोळ्यासमोर ठेऊन राज्य केलं. त्याप्रमाणे ५० वर्ष सत्तेत राहण्यासाठी काम केलं पाहिजे,' असं अमित शाह कार्यकर्त्यांना म्हणाले आहे. अमित शहा पुढे म्हणाले, 'केवळ निवडणुकीपर्यंतचा विचार करून काही होणार नाही. विकासकामांत अखेरपर्यंत जीव ओतून काम करायला हवं.

# नाणारच्या भूसंपादनाची अधिसूचना रद्द नाही

मुंबई (सम्यक कासारे)- 'अधिसूचना रद्द करण्याचा अधिकार फक्त उच्चस्तरीय समितीलाच आहे. सरकारने आज तरी नाणार भूसंपादनाची कोणतीही अधिसूचना रद्द केलेली नाही.' असं स्पष्टीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं आहे. त्यामुळे नाणार प्रकल्पासंबंधी भूसंपादनाची अधिसूचना रद्दच झाली नसल्याचं आता समोर आलं आहे. त्यामुळे सरकार विरोधानंतरही नाणार प्रकल्पाबाबत सकारात्मक असल्याचं दिसून येत आहे. 'उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी भूसंपादनाची मूळ अधिसूचना रद्द केली आहे. त्यामुळे आता नाणार प्रकल्प होणार नाही.' असा दावा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज नाणारमधील सभेत केला होता. मात्र, अशी कोणतीही



अधिसूचना अद्याप सरकारने रद्द केलेली नाही. असं खुद्द मुख्यमंत्र्यांनी माध्यमांना सांगितलं.सुभाष देसाईंनी अधिसूचना रद्द करण्याबाबतचं मत व्यक्त केलं. पण ते त्यांचं वैयक्तिक मत आहे.

## नाणार प्रकल्प गेला, तो होऊ देणार नाही

रत्नागिरी (योगेश होळंब)- 'नाणार देणार नाही', असं म्हणत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी नाणारमध्ये रिफायनरी प्रकल्प होऊ देणार नसल्याचा निर्धार केला.उद्धव ठाकरे यांनी नाणारमध्ये जाहीर सभा घेत, नाणार प्रकल्पाला तीव्र विरोध केला.कोकणाला उद्ध्वस्त केलं, तर तुम्हाला उद्ध्वस्त करु. नाणारचा प्रकल्प शिवसेना होऊ देणार नाही, त्यासाठी नाणारवासियांची एकजूट कायम ठेवा, असं आवाहन उद्धव ठाकरे यांनी केलं. उद्धव ठाकरे म्हणाले, 'महाराष्ट्राच्या आणि कोकणाच्या पवित्र भूमित नाणार प्रकल्प होऊ देणार नाही. कोकणवासियांच्या मूळावर उठणार प्रकल्प कशाला? कोकणातला हा प्रकल्प विदर्भात न्या. कोकणचं गुजरात होऊ देणार नाही. भूसंपादन होणार नाही म्हणजे प्रकल्पच होणार नाही.



## पाकनं कृत्य थांबवलं नाही तर त्यांना जागेवर आणण्याची धमक आहे

पटना (हिंदुस्थान समाचार)- पाकिस्तानकडून वारंवार भारताला तोडण्याचे प्रकार सुरु आहेत. तसेच त्यांच्याकडून धार्मिक विद्वेषही पसरवला जात आहे. मात्र पाकनं हे कृत्य थांबवलं नाही तर त्यांना पुन्हा जागेवर आणण्याची आपल्यामध्ये धमक असल्याचा इशारा केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी दिलाय. देशातील हिंदू-मुस्लिमांमध्ये फूट पाडण्याचे काम करु नका. कारण, भगतसिंह आणि चंद्रशेखर आझाद यांच्यासारखच अश्फाकउल्लाह खान यांनी देखील भारतासाठी सर्वोच्च बलिदान दिले आहे. त्यामुळे पाकिस्तानकडून कितीही फूट पाडण्याचा प्रयत्न झाला तरी आम्ही देशाचे शिर कधीही झुकू देणार नाही, अशी ग्वाही देखील राजनाथ सिंह यांनी दिलीय. ते बिहारमधील पाटना येथे एका



जाहीर कार्यक्रमात बोलत होते. पाकिस्तानला इशारा देताना राजनाथ म्हणाले, आपले जवान त्यांना जोरदार प्रत्युत्तर देत आहेत.

## कठुआतील मुलीवर बलात्कार नाही, केवळ हत्या -साध्वी प्रज्ञा

गांधीनगर (हिंदुस्थान समाचार)- काश्मीरमधील कठुआ सामूहिक प्रकरणानंतर संपूर्ण देशात संतापाची लाट असताना, काही राजकीय नेते ह्या मुद्द्यावर राजकारण करण्यात मागे नाहीत. कठुआ प्रकरणात माणुसकीला पायदळी तुडवत, राजकारण सुरु असलेल्यांमध्ये आणखी एका नावाचा समावेश झाला आहे. हे नाव म्हणजे साध्वी प्रज्ञा ठाकूर. गुजरातच्या नवसारीमध्ये आयोजित एका कार्यक्रमात हजेरी लावलेल्या साध्वी प्रज्ञा ठाकूरने वादग्रस्त विधान केलं आहे. ती म्हणाली की, 'कठुआ प्रकरण एक असं षडयंत्र आहे, जे ऐकून मनात



एका विशेष जातीवर्गासाठी घृणा निर्माण होते, जे मुस्लीम, काँग्रेस आणि डावे आहेत.''एवढं घृणास्पद कृत्य ज्याला बलात्कार म्हटलं जातं, तो झालाच नाही. तिची केवळ हत्या झाली, हे वैद्यकीय अहवाल सांगतो. हत्या कोणी केली याची माहिती नाही. एका मुस्लीमाने आपल्या मुलीवर बलात्कार झाल्याचा आरोप करत त्यात एका हिंदूला अडकवलं. यापेक्षा बीभत्स राजकीय षडयंत्र असूच शकत नाही,' असं साध्वी प्रज्ञा म्हणाली.

## रघुराम राजन बँक ऑफ इंग्लंडच्या गव्हर्नरपदी?

लंडन (पीटीआय)- रघुराम राजन यांचा विचार बँक ऑफ इंग्लंडच्या गव्हर्नरपदासाठी केला जातोय, अशी बातमी लंडनच्या प्रतिष्ठित फायनान्शियन टाईम्सनं दिलीये. राजन यांची नियुक्ती होणारच, अशा अर्थाची ही बातमी नाहीये. बँक ऑफ इंग्लंडचे विद्यमान गव्हर्नर पुढच्या वर्षी निवृत्त होणार आहेत. त्यांच्या जागी कुणाला नियुक्त करायचं, याची प्रक्रिया ब्रिटनचे चान्सलर फिलीप हॅमंड लवकरच सुरू करणार आहेत.राजन यांच्याबरोबरच श्रिती वडेरा, या ब्रिटनमधल्या राजकारणी आणि अर्थतज्ज्ञ यांचंही नाव घेतलं जातंय.राजन हे आंतरराष्ट्रीय अर्थतज्ज्ञ असून आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे ते वयाच्या ४० व्या वर्षी प्रमुख झाले. राजन यांनी २००५ मध्ये शोध निबंध सादर करून आर्थिक मंदीचा अंदाज व्यक्त केला होता.



## श्रेयवादासाठी शिवसेना-भाजप आमने-सामने

मुंबई (अमोल गुडेकर)- केंद्रात आणि राज्यात सत्तेमध्ये भाजप आणि शिवसेनेत मात्र पुन्हा एकदा श्रेयवाद साठी आमने सामने येताना दिसत आहेत. कामाचे श्रेय लाटण्याचा नादात पुन्हा एकदा हे दोन्ही पक्ष एकमेकांच्या समोर आल्याचं दिसून आलं आहे.कांदिवली पूर्वेत ठाकूर कॉम्प्लेक्स विभागात महानगरपालिका अग्निशमन दलाचे केंद्र उभारण्यात आले आहे. मात्र त्यानंतर सुरू झाली ती श्रेयवादाची लढाई. या उद्यानाच्या




उद्घाटनाचा कार्यक्रम दोन्ही पक्षांकडून वेगवेगळा ठरवण्यात आला. त्यामुळे या भागातलं राजकारण तापलंय. सुरुवातीला या कार्यक्रमाचं उद्घाटन शिवसेना संध्याकाळी पाच वाजता करणार होती. मात्र सेनेवर कुरघोडी करण्यासाठी भाजपने याच उद्यानाच्या उदघाटनाचा कार्यक्रम सकाळी अकरा वाजता असेल असे होर्डिंग्स लावले.

# आता फरार आर्थिक गुन्हेगारांची संपत्ती होणार जप्त

**पुणे (अभिजीत येरल्लु)- आर्थिक गुन्हे करून देश सोडून पळून जाणाऱ्या गुन्हेगारांची संपत्ती जप्त करून त्यांची नाकेबंदी करण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. याबाबत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबतच्या अध्यादेशास मंजुरी मिळाली आहे. राष्ट्रपतींच्या सहमतीनंतर यावर शिक्कामोर्तब होणार आहे.**

लोकसभेत १२ मार्चला 'फरार आर्थिक गुन्हेगार विधेयक २०१८' हा अध्यादेश सादर करण्यात आला होता. परंतु संसदेत झालेल्या गोंधळामुळे हे विधेयक मंजूर होऊ शकले नव्हते. विजय मल्ल्या आणि नीरव मोदीसारखी प्रकरणे समोर आल्यानंतर हा अध्यादेश आणण्याचा सरकारने निर्णय घेतला होता.

कर्ज घेतल्यानंतर जे परदेशात पळून जातात आणि देशात परतण्यास नकार देतात अशा गुन्हेगारांना, तसेच त्यांनी केलेल्या गुन्हाविरोधात अटक वॉरंट काढण्यात आले असेल अशा



गुन्हेगारांना, तसेच ज्यांनी १०० कोटी रुपयांहून अधिक कर्जासाठी ज्यांचे नाव डिफॉल्टर्स यादीत नमूद असेल अशा गुन्हेगारांना या विधेयकातील तरतुदी लागू होणार आहेत.

या अध्यादेशानुसार, अशा गुन्हेगार व्यक्तींच्या परवानगी शिवाय त्यांची संपत्ती जप्त केली जाऊ शकणार आहे. या अध्यादेशातील तरतुदींनुसार जप्त केलेल्या संपत्तीचा लिलाव करून ते कर्ज फेडण्याचे कामही होणार आहे. शिवाय अशा आर्थिक गुन्हेगारांविरोधात पीएमएलए कायद्यांतर्गत खटला चालवला जाणार आहे.

या अध्यादेशानुसार, संचालक किंवा उपसंचालक (एमपीएलए, २००२ अंतर्गत नियुक्त) विशेष कोर्टासमोर कर्ज घेऊन परतावा न करणाऱ्या व्यक्तीला पळून गेलेला आर्थिक गुन्हेगार घोषित करण्याची मागणी करू शकणार आहेत. मात्र संबंधित व्यक्तीला पळून गेलेला आर्थिक गुन्हेगार का ठरवावे याची कारणेही द्यावी लागणार आहेत.

या मागणीपत्रानंतर विशेष कोर्ट त्या व्यक्तीला नोटीस पाठवून ६ आठवड्यांमध्ये कोर्टासमोर हजर राहण्याचे आदेश देऊ शकते. त्यानंतर ती व्यक्ती कोर्टाच्या आदेशानुसार हजर राहिली, तर त्याला पळून गेलेला आर्थिक गुन्हेगार म्हणून संबोधण्याची मागणी रद्द करण्याची तरतूदही अध्यादेशात करण्यात आली आहे.

# भारत–चीन संबंध सुधारणार?

## पुढील आठवड्यात पंतप्रधान जाणार चीन दौऱ्यावर, शी जिनपिंग यांची घेणार भेट



नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)- युरोप दौऱ्यावरून परतल्यानंतर आता पंतप्रधान नरेंद्र मोदी लवकरच चीनच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग यांची भेट घेणार आहेत. परराष्ट्रमंत्री सुषमा स्वराज आणि चीनचे समकक्ष प्रतिनिधी वांग यी यांची आज बीजिंग येथे भेट झाली. यावेळी झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत चीनचे परराष्ट्रमंत्री यी यांनी ही माहिती दिली. २७ आणि २८ एप्रिल रोजी अनौपचारिक उच्चस्तरीय बैठकीत मोदी आणि जिनपिंग हे दोन्ही नेते एकाच व्यासपीठावर येणार आहेत, अशी माहिती यावेळी यी यांनी दिली.

दोन्ही देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांमधील बैठकीत द्विपक्षीय संबंधात सुधारणेसाठी आणि उच्चस्तरीय संवादाची गती वाढवण्यावर चर्चा झाली. यावेळी सुषमा स्वराज म्हणाल्या, दोन्ही देश दहशतवाद, हवामान बदल आणि जागतिक आरोग्य यांसारख्या मुद्द्यांवर एकत्र काम करणार आहेत. तर चीनकडून २०१८ मध्ये सतलज आणि ब्रह्मपुत्रा नदीबाबतची माहिती प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

शांघाई सहकार्य संघटनेच्या (एससीओ) मंत्र्यांच्या बैठकीत सहभाग घेण्यासाठी सुषमा स्वराज शनिवारी चार दिवसांच्या दौऱ्यासाठी चीन दौऱ्यावर गेल्या आहेत. द्विपक्षीय भेटीपूर्वी वांग यांनी पेइचिंग येथील दिआयुतई स्टेट गेस्ट हाऊस येथे सुषमा स्वराज यांचे स्वागत केले. स्टेट काऊंसिलर झाल्यानंतर वांग आणि स्वराज यांची ही पहिलीच भेट झाली.

या भेटीदरम्यान, सुषमा यांनी वांग यांना स्टेट काऊंसिलर झाल्याबद्दल आणि भारत चीन सीमेसंदर्भात विशेष प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केल्याबद्दल अभिनंदन केले. दरम्यान, वांग यांनी सांगितले की, द्विपक्षीय संबंधांमध्ये उल्लेखनीय विकास झाला आहे. त्याचबरोबर दोन्ही देशांच्या नेत्यांच्या देखरेखीखाली या वर्षी सकारात्मक गोष्टीही घडल्या आहेत.

## सौजन्य व्हॉट्सअप




# गोव्यात समुद्रातील पाण्याच्या पातळीमध्ये वाढ

पणजी (योगेश होळंब)- गोव्यात समुद्रातील पाण्याच्या पातळीत अचानक वाढ झाल्यानं मोठ्या लाटा उसळून किनाऱ्यावरील शॅकमध्ये पाणी घुसल्यानं मोठं नुकसान झालं आहे. उत्तर गोव्यातील कांदोळी, कळंगुट, केरी, आश्वे किनाऱ्यांवर याचा फटका बसला आहे. यामुळे शॅक मालकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.रविवारी समुद्र किनाऱ्यावरील शॅक्सच्या किचनमध्ये पाणी घुसल्याने दैनंदिन वापरासाठी आणलेले काही पदार्थ वाहून गेले. यावेळी शॅक्स चालकांना लाकडी पलंग, खुर्च्या वाचवण्यासाठी बरीच धावपळ करावी लागली. या पर्यटन हंगामातील ही दुसरी घटना आहे. यापूर्वी 'ओखी' वादळावेळी असेच नुकसान झालं होतं. समुद्राच्या पाण्याची पातळी अचानक वाढल्यानं आश्वे-मांद्रे किनारी भागात वरपर्यंत पाणी आलं होतं.दरम्यान, नेमकी कोणत्या कारणामुळे समुद्रातील पाण्यात वाढ झाली याचे कारण अद्याप समजू शकलेलं नाही. मात्र, यामुळे किनाऱ्यावरील शॅक आणि रेस्टॉरंटचे बरेच नुकसान झाले आहे.

# मोदी दलितविरोधी, संविधान उद्ध्वस्त करु देणार नाही

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)- काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी संविधान बचाओ अभियानाची सुरुवात करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोल केला. पंतप्रधान मोदींच्या कमऱ्योगी - नरेंद्र मोदी या पुस्तकातील वाक्यांचा वापर करताना राहुल गांधींनी पंतप्रधान दलितविरोधी असल्याचं सांगितलं. सरकार सर्वोच्च न्यायालय, संसद नष्ट करण्याचा कट रचत असल्याचा आरोपही त्यांनी आपल्या भाषणात केला आहे.काँग्रेसने दिल्लीतील तालकटोरा स्टेडियममधून 'संविधान बचाओ' अभियानाची सुरुआत केली. पुढील वर्षी भीमराव आंबेडकर जयंतीपर्यंत (१४ एप्रिल) हे अभियान सुरु राहणार आहे. संविधान आणि दलितांवरील हल्ल्याच्या मुद्द्यांना राष्ट्रीय स्तरावर वाचा फोडणं हा त्यामागील उद्देश आहे. पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीआधी दलित व्होट बँक आपल्या बाजूने वळवण्यासाठी काँग्रेसचं हे अभियान महत्वाचं समजलं जात आहे. देशात १७% दलित मतदार आहेत. 'पंतप्रधान केवळ स्वत:च्या मन की बात ऐकतात. त्यांना कोणाला बोलू द्यायचं नाही. त्याला अरुण जेटली, नितीन गडकरी यांना बोलू द्यायचं नाही.



## संपादकीय..

संपादक:- राकेश शंकर गोरे

# कठोर शिक्षेचे स्वागत, परंतु...

अल्पवयीन मुलींवर बलात्कार करणाऱ्यांना फाशी देण्याची तरतूद सरकारने केली आहे. देशातील बँकांना गोत्यात आणून परदेशात सुखेनैव वास्तव करणाऱ्यांची संपत्ती जप्त करण्याची तरतूदही दुसऱ्या एका कायद्यात करण्यात आली. सध्याच्या कायद्यातील तरतूद पुरेशी कडक नाही, असे मत प्रगट होत होते व कायदे बदलण्यासाठी आग्रह धरला जात होता.

कठुआ व उन्नाव येथील प्रकरणांमुळे हा विषय पुन्हा ऐरणीवर आला. उन्नाव व कठुआ, त्यातही कठुआ येथील प्रकरण शहारे आणणारे व शरमेने मान खाली घालायला लावणारे आहे. सरकार पक्षातील नेत्यांचे त्यावरील मौन किंवा आडवळणाने होणारे असमर्थन ही त्यातील अतिशय उद्विग्न करणारी बाब. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अशी घोषणा करणाऱ्या मोदींकडून तीव्र प्रतिक्रियेची व उपाययोजनांची अपेक्षा होती. पण माध्यमांतून प्रसिद्धी मिळणारी प्रत्येक घटना हे हिंदू संघटनांशी संबंधित गट किंवा भाजपचे नेते यांची बदनामी करण्याचे कटकारस्थान आहे, अशी मोदी सरकारची ठाम समजूत असल्याने सरकार पक्षातर्फे त्याकडे दुर्लक्ष केले गेले.



मोदींचे मौन हे मोदींबद्दल आस्था असणाऱ्यांनाही पटलेले नाही याची जाणीव फार उशिरा सरकारला झाली. लंडनमधील कार्यक्रमात मोदींनी वाईट मार्गाने जाणाऱ्या मुलांवर संस्कार करण्याचा कोरडा उपदेश केला. पण सरकारकडून अपेक्षा असते ती कुणाचाही मुलाहिजा न ठेवता कायद्याचे राज्य कठोरपणे प्रस्थापित करण्याची. मुलाहिजा न ठेवता कायदा राबवण्याचे संस्कार कृतीतून होणे महत्त्वाचे आहे. राजकीय दबावाखाली काम करण्याची सवय या देशात मुरलेली आहे. ती कोणी मुरवली हा प्रश्न आता गैरलागू आहे. कायदा कठोरपणे अमलात आणण्याचा संस्कार मोदी करतात का, हा सवाल आहे. जनतेचा रोष लक्षात आल्यावर अध्यादेश काढून कायदे बदलण्याचा निर्णय घेण्यात आला. आता बारा वर्षांखालील मुलीवर बलात्कार करणाऱ्याला फाशी, त्या प्रकरणातील खटला सहा महिन्यांत पूर्ण करण्याची तसेच त्वरित तपासाची सक्ती करण्यात आली आहे.

समाजातील हिंसकता व लैंगिक अत्याचाराचे प्रमाण वेगाने वाढत असताना अशा कठोर कायद्याची गरज होती. पण ते पुरेसे नाही. समाजातील स्त्री-पुरुषांच्या तुलनात्मक प्रमाणापासून समाजातील मुजोरी व नैराश्य, चित्रपट व अन्य माध्यमांचा विशिष्ट मनोरचनेच्या मुलांवर व व्यक्तींवर होणारा परिणाम, पोर्नोग्राफिक साहित्य व चित्रफिती सुलभ मिळण्याची सुविधा अशा अनेक कारणांचा त्यामध्ये समावेश आहे. परदेशात त्यावर भरपूर डेटा घेऊन संशोधन होत आहे. व्यक्तीप्रमाणे समाजाची मनोरचना कशी घडते यावर शास्त्रीय विचार करण्याची परंपरा पाश्चात्त्य देशात आहे. ती परंपरा आपल्याकडे नाही. भारतातील बहुसंख्य लोक अद्यापही मध्ययुगीन मानसिकतेत जगतात, मात्र भाषा पुरोगामित्वाची करतात. शास्त्रीय चर्चा वा विश्लेषण यापासून माध्यमे व विश्वविद्यालयेही कित्येक मैल दूर आहेत. यामुळे माध्यमांमध्येही विश्लेषणापेक्षा दुसऱ्याचे दोष दाखवणे, कोणत्याही पुराव्याविना आरोप करणे आणि टाळ्या मिळवणारा युक्तिवाद करणे याला जोर येतो. शास्त्रीय विवेचनाला मज्जाव असतो. हृदयरोगाची लक्षणे नसतानाही लोया यांची हृदयक्रिया बंद कशी पडली असा प्रश्न तथाकथित मान्यवर कायदेतज्ज्ञ टीव्हीवर करतात तेव्हा आश्चर्य वाटते. हृदयक्रिया अचानक बंद पडण्याची अनेक उदाहरणे आहेत व अनेक रोगांची निश्चित कारणे अद्याप विज्ञानाला माहीत झालेली नाहीत. पण एकदा मत निश्चित केले की त्याच दिशेने न्यायालयापासून सर्वांनी विचार केला पाहिजे व कारवाई केली पाहिजे असा दबाव टाकला जातो. न्यायालय व पोलिसांवर येणाऱ्या राजकीय दबावाइतकाच हा दबावही धोकादायक असतो. त्याकडे दुर्लक्ष होते.

अशा सामाजिक स्थितीत केवळ कडक कायदे करून परिस्थिती बदलत नाही. भारतातील मुख्य समस्या पोलिस यंत्रणेतील सुधारणा ही आहे. पोलिसांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढवणे, अद्ययावत तंत्र-शास्त्र वापरून तपास करणारे निष्णात दल घडवणे, साक्षीदारांना सुरक्षा पुरवण्याची हमी, लोकसंख्येच्या प्रमाणात न्यायालयांची संख्या, तपासात मुद्दाम त्रुटी ठेवणाऱ्या पोलिसाबरोबरच त्याच्या वरिष्ठांवरही कडक कारवाईची शिफारस अशा अनेक सुधारणांची गरज आहे. खोट्या तक्रारी दाखल केल्यास तक्रारदाराला जबर सजा देणारी सुधारणा तर त्वरित होण्याची गरज आहे. या एका सुधारणेमुळे न्यायालयात जाणारे खटले मोठ्या प्रमाणात कमी होतील. काँग्रेसी राजवटीत या सुधारणा झाल्या नाहीत. कारण सुधारणा न करण्याचे बरेच फायदे होते. पण मोदींनीही या सुधारणांना प्राधान्य दिले नाही हे पाहता त्यांनाही हितसंबंध राखायचे असावेत. कायदे कितीही कडक केले तरी वर उल्लेख केलेल्या सुधारणा झाल्या नाहीत तर कडक कायदेही लेचेपेचे राहतील. आर्थिक भ्रष्टाचार करणाऱ्यांच्या जप्तीच्या कायद्यालाही हेच तत्त्व लागू आहे.



# पाऊसमानाचा पॅटर्न!

'मान्सून' हा तसा जिव्हाळ्याचा विषय, मात्र सध्याच्या माहितीच्या युगात त्याच्या भाकितांवर बरीच उलटसुलट चर्चा रंगत असते. येत्या मान्सूनविषयी आश्वासक अंदाज 'आयएमडी'ने वर्तवला आणि दीर्घकालीन सरासरीच्या ९५ टक्के पाऊसमान राहील असे संकेत दिले. थोडक्यात सांगायचे तर हा मान्सून समाधानकारक स्वरूपाचा राहील असे अभिप्रेत आहे. खरेच देशभर समाधानकारक पाऊस होईल का, या प्रश्नाचे उत्तर निश्चितच 'नाही' असेच मिळेल. यासंदर्भात मुंबईतील 'आयआयटी'ने ११२ वर्षांच्या नोंदींचा अभ्यास केला आणि पावसाचा पॅटर्न बदलल्याचे सिद्ध केले. देशातील ६४० पैकी २३८ जिल्ह्यांत ही स्थिती निदर्शनास आली आहे. म्हणजेच पावसाचा पॅटर्न बदलल्याने सरासरी लाभदेखील कमी होणार हे निश्चित. हवामान खाते असो किंवा स्कायमेट, भेंडवळ या सगळ्यांचे काही आडाखे असतात, एक मॉडेल किंबहुना प्रतिमान ते समोर ठेवतात. अर्थातच त्यात काही प्रमाणात बदल गृहीत असतातच. त्यामुळे अधिक तपशिलात जाऊन पावसाची व्याप्ती किंवा प्रमाण याविषयी कोणीही ठोस काही सांगू शकत नाही. सध्या वाढत असलेल्या उन्हाच्या झळांच्या पार्श्वभूमीवर आलेली ही हळुवार झुळूक म्हणता येईल इतकेच. वस्तुत: ढोबळमानाने विचार करता हवामान खात्याचा अंदाज साधारणपणे पाच वर्षांतून एकदा सरासरीच्या जवळपास पोहोचताना दिसतो. उदाहरणच घ्यायचे तर २००८ मध्ये मान्सूनविषयी वर्तवलेला अंदाज बरोबर ठरला होता. त्यानंतर गेल्या वर्षी तो नेमका खरा ठरला. गेल्या २० वर्षांत पावसाचा पॅटर्न बराच बदललेला आहे. साधारणपणे ५० वर्षांतील आकडेवारी तपासून पाहिली तर सलग दोन वर्षांपेक्षा अधिक काळ असमाधानकारक पाऊस जसा दिसत नाही तसेच सलग तीन वर्षे चांगला पाऊस झाल्याचेही दिसून येते.



महाराष्ट्र शासन

ई-निविदा सूचना

JOD NO.- 1952 B 7101 391 2018-2019 71 0010 CR 2059

1842 A 7101 400 2018-2019 71 0011 CR 2059

1896 B 7101 037 2018-2019 71 0012 CR 2059

JOD NO.- 1950 A 7101 429 2018-2019 71 0013 CR 2059

1885 B 7101 037 2018-2019 71 0014 CR 2059

1875 B 7101 016 2018-2019 71 0015 CR 2059

डीजीआयपीआर/ २०१८-२०१९/४८२

## सुडोकू क्रमांक- ४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 1 | | 8 | | |
| 3 | | | 6 | | | | 5 | |
| | | 8 | | 9 | 5 | 4 | 1 | 3 |
| 4 | 8 | 5 | | | 6 | | | 7 |
| 2 | | | | | | | | 5 |
| 7 | | | 9 | | | 2 | 6 | 8 |
| 1 | 9 | 3 | 2 | 6 | | 5 | | |
| | 4 | | | | 8 | | | 2 |
| | | 2 | | 4 | | | | |




व्यंगचित्र

## थोडक्यात महत्वाचे

### महिला ५७ लाख, शौचालये ४ हजार!

**मुंबई (नमिता मुणगेकर)** - महाराष्ट्राचा ग्रामीण भाग 'हागणदारीमुक्त' झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले असले तरी देशाच्या आर्थिक राजधानीत स्त्री-पुरुषांकरिता उपलब्ध असलेल्या शौचकुपांच्या संख्येवरून असमानतेचा वेगळाच मुद्दा समोर आला आहे. समाजाच्या विविध सामाजिक पातळ्यांवर दिसणारी स्त्री-पुरुष असमानता सार्वजनिक शौचालयांमध्येही दिसत असून शहरातील दर सहा शौचकुपांमागे स्त्रियांच्या वाटेला केवळ एक शौचकूप आले आहे. हागणदारीमुक्तीसाठी महानगरपालिकेने गेल्या वर्षभरात अनेक शौचालये बांधल्याचा दावा केला जात असला तरी वास्तवात स्त्रियांना मोकळे होण्यासाठी घराचाच आसरा घ्यावा लागत आहे. शहरातील ५७ लाख स्त्रियांसाठी अवघी ३९०९ शौचालये असून १५०० स्त्रियांसाठी केवळ एक शौचकूप किंवा मुतारी उपलब्ध आहे. प्रजा फाऊंडेशनने नागरी सेवासुविधांबाबत जाहीर केलेल्या अहवालातून ही माहिती समोर आली आहे. एकीकडे संपूर्ण राज्य हागणदारीमुक्त झाल्याचा दावा केला गेला असतानाच शहरातील सार्वजनिक शौचालयांची संख्या मात्र फारशी वाढलेली नाही. त्यातही पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांच्या शौचालयांची स्थिती अगदीच शोचनीय आहे. संपूर्ण शहरात पुरुषांसाठी १०,७७८ शौचकूप/ मुतारी असून स्त्रियांसाठी मात्र केवळ ३,९०९ शौचकूप आहेत. याचाच अर्थ पुरुषांच्या १०० शौचकुपांच्या तुलनेत स्त्रियांची केवळ ३४ शौचकूप आहेत. हे प्रमाणही सरासरी असून प्रत्येक वॉर्डनुसार परिस्थिती बदलताना दिसते. गिरगाव परिसर असलेल्या सी वॉर्डमध्ये स्त्रियांच्या शौचकुपांचे प्रमाणे अवघे १५ टक्के असून दहिसर परिसरातील आर उत्तर प्रभागात स्त्रियांच्या शौचकुपांचे सर्वाधिक म्हणजे केवळ ५० टक्के प्रमाण आहे.




**सुविचार** इतिहास घोकण्यापेक्षा इतिहास निर्माण करणे महत्वाचे.

## साप्ताहिक राशिभविष्य

**मेष-** तुमचा जीवनाविषयीचा दृष्टिकोन सकारात्मक बनेल. आनंदी व आशावादी मनाने कार्यरत रहाल. उत्साह व उमेद वाढेल.

**वृषभ-** प्रवास शक्यतो टाळावेत. जप-जाप्य,ध्यान-धारणा यामध्ये मग्न राहाल. काहींना इास्पितळाला भेट द्यावी लागेल.

**मिथुन-**आरोग्य उत्तम राहील. तुमचे विचार अधिकाधिक प्रगल्भ होतील. तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव वाढेल.

**कर्क-**राहत्या जागेच्या प्रश्नांविषयी अधिक गांभीर्याने विचार कराल. वैवाहिक सौख्य उत्तम लाभेल. पत्नीचे सहकार्य उत्तम लाभेल.

**सिंह-** मनोबल व इच्छाशक्ती वाढेल. आत्मविश्वासाच्या जोरावर तुमच्यावर असणारी जबाबदारी पूर्ण करू शकाल.

**कन्या-** आज आपणाला काही भाग्यकारक अनुभव येतील. वडीलधाऱ्यांचे व वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

**तूळ-** मित्र-मैत्रिणींशी सुसंवाद साधून त्यांचे सहकार्य मिळवण्यात यशस्वी व्हाल. वरिष्ठांचे व वडीलधाऱ्यांचे उत्तम मार्गदर्शन मिळेल.

**वृश्चिक-** मनोबल व इच्छाशक्ती चांगली राहणार आहे. आरोग्याच्या तक्रारींकडे मात्र कानाडोळा करून चालणार नाही.

**धनु-** एखादी मानसिक चिंता सतावेल. औदासिन्याची छाया तुमच्या व्यक्तिमत्त्वावर राहील. व्यवसायात अडचणी जाणवतील.

**मकर-** आज तुम्ही घेतलेले निर्णय योग्य ठरणार आहेत. त्यामुळे महत्त्वाचे निर्णय घेण्यास हरकत नाही.

**कुंभ-** आर्थिक कामांसाठी दिवस चांगला आहे. उधारी-उसनवारी वसूल होईल. त्यासाठी प्रयत्न करावेत.

**मीन-** मनोबल कमी राहणार आहे. त्यामुळे कामांमध्ये अडचणी येण्याची शक्यता आहे. आध्यात्मिक प्रगती होईल.

## महाराष्ट्र क्राईम टाइम्स

प्रकट निवेदन

**रेग्युलेशन ऑफ न्यूज पेपर्स**

**( सेंट्रल रूल्स 1956, नियम क्र. 9 ) अन्वये साप्ताहिक**

**'महाराष्ट्र क्राईम टाइम्स' वृत्तप्राची मालकी व इतर तपशीला संबंधी निवेदन**

| | | |
|---|---|---|
| 1. प्रकाशन स्थळ | : | सोमानी प्रिंटींग प्रेस, गाला नं. 3-4 आमीन, इंडस्ट्रीय इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई- 400 063 महाराष्ट्र |
| 2. प्रकाशनाचे कालमान | : | साप्ताहिक |
| 3. मुद्रकाचे नाम | : | श्री राकेश शंकर गोरे |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | विष्णू सदन सोसायटी रामचंद्र सुखई सोसायटी नं. 1, रूम नं. 4, जयहिंद नगर, खार (पूर्व), मुंबई- 400 051 |
| 4. प्रकाशकाचे नाव | : | श्री राकेश शंकर गोरे |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | विष्णू सदन सोसायटी रामचंद्र सुखई सोसायटी नं. 1, रूम नं. 4, जयहिंद नगर, खार (पूर्व), मुंबई- 400 051 |
| 5. प्रमुख संपादकाचे नाव | : | श्री राकेश शंकर गोरे |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | विष्णू सदन सोसायटी रामचंद्र सुखई सोसायटी नं. 1, रूम नं. 4, जयहिंद नगर, खार (पूर्व), मुंबई- 400 051 |

6. वृत्तपत्राचे मालक असणाऱ्या व्यक्तीचे आणि भागीदाराचे व भांडवलाच्या एका टक्क्यापेक्षा अधिक भाग असणाऱ्या भागधारकांची नावे व पत्ते : नाही

मी राकेश शंकर गोरे या अन्वये जाहिर करतो की, वरील दिलेली माहिती व माझ्या समजुतीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खरी आहे.

**प्रकाशकाची सही**

**श्री राकेश शंकर गोरे**

हे मराठी साप्ताहिक **मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक राकेश गोरे** यांनी सोमानी प्रिंटींग, प्रेस गाला नं. ३-४, अमिन इंडस्ट्रीयल इस्टेट, सोनावाला क्रॉस रोड नं. २,जवाहर नगर फाटक ब्रिज जवळ, गोरेगांव (पूर्व), मुंबई- ४०० ०६३. येथे छापून विष्णू सदन सोसायटी रामचंद्र सुखई सोसायटी नं. १, रूम नं. ४, जयहिंद नगर, खार (पूर्व), मुंबई- ४०० ०५१. येथे प्रकाशित केले. R.N.I. NO. MAHMAR/2010/33301. Mob. 9892631863, 9892632268, 022-69998811, website:maharashatracrimetimes.com,Email-maharashtracrimetimes33301@gmail.com, rakeshgore81@gmail.com **कायदेशीर सल्लागार-** एडवोकेट, हाईकोर्ट मुंबई, डी. के. पांडे (बी.ए.एल.एल.बी.) हा अंक प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# चंद्रकांत पाटलांनी निवडणूक लढवावी पवारांचं कोल्हापुरात आव्हान



**कोल्हापूर (प्रकाश पवार)-** अर्थव्यवस्था अडचणीत आहे. शेतकऱ्यांपासून सगळेच अडचणीत आले आहेत. धोरणात्मक निर्णय हे मुख्यमंत्री घेत असतात, मात्र आता ते निर्णय कोल्हापूर या उपकेंद्रातून घेतले जात आहेत, असं म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवारांनी महसूलमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर निशाणा साधला. ते कोल्हापूरमध्ये पत्रकार परिषदेत बोलत होते.आयुष्यात कधी संधी मिळाली नाही तरी, सकाळ -दुपार- संध्याकाळ संधी घेतली जाते. त्यामुळे चंद्रकांत पाटील यांनी एकदा निवडणूक लढवावी, मग त्यांना समजेल, असं थेट आव्हान शरद पवारांनी दिलं. चंद्रकांत पाटील पुणे पदवीधरमतदार संघातून निवडून आलेले आहेत. त्यामुळे त्यांनी विधानसभेची निवडणूक लढवावी, असं पवार म्हणाले.सध्या देशातील साखर उद्योग संकटात आहे. त्यामुळे साखरेवर ६० टक्के अधिभार लावा आणि ही रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्यांना द्या, अशी मागणी शरद पवार यांनी केली.सध्या साखरेचं गरजेपेक्षा जास्त उत्पादन झालं आहे. साखरेचा साठा कमी करण्यासाठी निर्यात वाढवायला हवी. जोपर्यंत साठा कमी होत नाही, तोपर्यंत बाजारभाव वाढणार नाही. त्यामुळे सरकारने साखर निर्यातीस चालना द्यावी. त्यासाठी परदेशात पाठवण्याचा खर्च कमी केला पाहिजे. वाहतूक खर्चासाठी केंद्र सरकारनं मदत करावी, असं शरद पवार म्हणाले.

# १९ वर्षीय मराठी तरुण जैन धर्माची दिक्षा घेणार

**डोंबिवली (राकेश गायकवाड)-** जैन धमिऱ्यांमध्ये लहान मुलांनी दिक्षा घेत साधू, मुनी झाल्याचं आपण अनेकदा पाहिलं. मात्र, डोंबिवलीतील एक १९ वर्षीय मराठी तरुण जैन धर्माची दिक्षा घेणार असल्याचं समोर आलं आहे. मंदार म्हात्रे असं या तरुणाचं नाव असून, तो आयुष्यभर जैन मुनी म्हणून धर्मप्रचारकाचं काम करणार आहे.२७ एप्रिलला डोंबिवलीत हा सोहळा पार पडणार आहे. म्हात्रे कुटुंबाचा शेजारी गुजराती जैन कुटुंब राहतं. लहानपणापासून मंदार या कुटुंबीयांसोबत जैन मंदिरात जात होता. तिथं एका



बालमुनीशी त्याची भेट झाली आणि आपल्या आयुष्याला कलाटणी मिळाल्याचं मंदारचं म्हणणं आहे. महत्वाची बाब म्हणजे एकुलत्या एक मुलाच्या या निर्णयानंतर आपण समाधानी असल्याचं त्याच्या वडिलांनी सांगितलं. मंदार आईवडिलांचा एकुलता एक मुलगा, सगळं लहानपण मराठमोळ्या डोंबिवलीत गेलेलं. पण हे सगळं मागे ठेऊन तो येत्या २७ एप्रिलला जैन धर्माची दीक्षा घेणार आहे. यानंतर आयुष्यभर तो जैन मुनी म्हणून जैन धर्माचा प्रचार करणार आहे. जैन धर्माची दीक्षा घेतल्यानंतर मंदारचं आयुष्य पुरतं बदलून जाणार आहे. अंगात पांढरे कपडे, जैन मंदिरात वास्तव्य, अनवाणी फिरणं. सुखवस्तू आयुष्याचा त्याग करणं, दोन वेळा जेवणं तर दूर, पण अगदी पंख्याची हवा किंवा फ्रिजचं पाणीही न पिणं असे जैन मुनींच्या आयुष्यात असलेले निर्बंध मंदारला पाळावे लागणार आहेत. महत्त्वाची बाब दीक्षा घेतल्यावर त्याचं नाव बदलून त्याला नवीन ओळख मिळणार आहे. त्यानंतर तो आयुष्यभर कधीही त्याच्या घरीही जाऊ शकणार नाही.

# स्वतःच्या मुलीसह ५५५ लग्न एकत्र आमदाराची सामाजिक बांधिलकी

**औरंगाबाद (प्रतिनिधी)-** स्वतःच्या मुला-मुलींच्या लग्नात कोट्यवधींचा खर्च करणारे नेते आपण पाहिले आहेत. पैशांची उधळपट्टी करणाऱ्या या विवाहांची चर्चाही झाली. पण महाराष्ट्रात असाही एक आमदार आहे, ज्याने स्वतःच्या मुलीच्या लग्नामंडपातच अनेकांचा संसार उभा केला. औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोड मतदारसंघाचे आमदार अब्दुल सत्तार यांनी ही सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. त्यांनी आपल्या मुलीच्या लग्नातच सामूहिक विवाह सोहळा घेत गरीब कुटुंबातील ५५५ मुलींची लग्न लावून दिली.ज्या गरीब शेतकऱ्यांच्या कुटुंबांना लग्नाचा खर्च झेपत नाही, त्यांना या सोहळ्यामुळे खुप मोठी मदत झाली आहे. यापूर्वी देखील अब्दुल सत्तार यांनी आपल्या मुलाच्या लग्नात ५०० जोडप्यांचं लग्न लावून दिलं होतं.लग्नात हेलिकॉप्टर, विमान, राजवाड्याच्या प्रतिकृती यांसाठी कोट्यवधींचा खर्च करणारे पुढारी आपण पाहिले आहेत. पण जमिनीवर राहून मातीतल्या माणसांच्या संसाराची वेल फुलवणाऱ्या या आमदारांचा आदर्श याच सोहळ्याला आलेले इतर नेतेही घेतील ही अपेक्षा.

# शिल्पा शिंदेकडून पॉर्न व्हिडीओ शेअर, हिना खान आक्रमक

**मुंबई (अमोल गुडेकर)-** 'बिग बॉस ११' ची विजेती अभिनेत्री शिल्पा शिंदे सध्या एका वादात सापडली आहे. सोशल मीडियावर नेहमीच ॲक्टिव्ह असलेल्या शिल्पाने, ट्विटरवर चक्क पॉर्न साईटची व्हिडीओ लिंक शिअर केली आहे.व्हिडीओ शेअर करताना शिल्पाने म्हटलं आहे की, 'जो श्शए माझा आहे असं सांगून बदनाम करण्याचा प्रयत्न करण्यात आला, त्या व्हिडीओमधील खरी मुलगी ही आहे'शिल्पाच्या या पोस्टनंतर तिला ट्विटरवर ट्रोल केलं जात आहे. बिग बॉस ११ मध्ये तिची प्रमुख प्रतिस्पर्धी हिना खान आणि तिचा बॉयफ्रेंड रॉकीने शिल्पावर हल्ला



चढवला आहे. हिना आणि रॉकीने शिल्पावर सोशल मीडियावर पॉर्न पसरवल्याचा आरोप केला आहे.

बिग बॉस ११ मध्ये शिल्पा आणि तिचा सहकारी स्पर्धक विकास गुप्ता यांच्यातील 'रिलेशन' खूपच गाजले होते. त्यावेळी शिल्पा शिंदेचा एक व्हिडीओ चर्चेत होता. या व्हिडीओत शिल्पा आणि विकास गुप्ता यांच्यातील 'इंटिमेंट सीन' दिसत होते.मात्र शिल्पा शिंदेने तो व्हिडीओ पुन्हा काढून, खरा व्हिडीओ आपल्या हाती लागल्याचं म्हटलं आहे. गेल्या काही दिवसांपासून एक श्शए व्हायरल होत होता, ज्यामध्ये दिसणारी महिला शिल्पा शिंदे असल्याचं म्हटलं जात होतं. मात्र आता शिल्पाने तोच श्शए आपल्या ट्विटरवरुन शेअर करत, आपल्याबद्दल अफवा पसरवणाऱ्यांवर निशाणा साधला.मात्र नेटकऱ्यांनी शिल्पा शिंदेलाच फटकारलं आहे.

# वाघा बॉर्डरवर पाकिस्तानी बॉलरचं चिथावणीखोर कृत्य, बीएसएफचा संताप

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)- वाघा बॉर्डरजवळ एका पाकिस्तानी क्रिकेटपटूने केलेल्या चिथावणीखोर कृत्यामुळे सीमा सुरक्षा दलाचे जवान चांगलेच संतापले आहेत. भारताकडून पाकिस्तानी क्रिकेटपटूच्या कृत्याबाबत आक्षेप नोंदवण्यात आला आहे. नेहमीप्रमाणे वाघा बॉर्डरवर ध्वज उतरवण्याचा सोहळा (फ्लॅग डाउन परेड सेरेमनी) सुरू असताना पाकिस्तानच्या क्रिकेट टीमचा वेगवान गोलंदाज हसन अली याने बीएसएफच्या जवानांकडे आणि भारतीयांकडे पाहून इशारे केले.**



२१ एप्रिल रोजी पाकिस्तान क्रिकेट टिमचे काही खेळाडू ध्वज उतरवण्याचा सोहळा पाहण्यास आले होते. या दरम्यान, भारत आणि पाकिस्तानचे जवान परेड करत असतानाच हसन अली पाकिस्तानी सैनिकांच्या मधोमध जाऊन उभा राहिला. पाकिस्तानचे जवान परेडमध्ये जे काही करत होते तसंच कृत्य हसन अली भारतीयांकडे पाहून करत होता, पण आश्चर्य म्हणजे यावेळी पाकिस्तानच्या लष्करानेही त्याला रोखण्याचा प्रयत्न केला नाही. मैदानावर गडी बाद केल्यानंतर ज्या प्रकारे अली आनंद साजरा करतो त्याचप्रमाणे तो भारतीयांकडे पाहून इशारे करत होता. बीएसएफने पाकिस्तानच्या क्रिकेटपटूच्या या कृत्यावर नाराजी जाहीर केली आहे. प्रोटोकॉलनुसार सेरेमनीमध्ये केवळ जवानच सहभागी होऊ शकतात, सामान्य व्यक्तीला सहभागी होता येत नाही असं बीएसएफने म्हटलं आहे. याबाबत पाकिस्तानी रेंजर्सला फोन करुन विरोध दर्शवण्यात आला आहे अशी माहिती बीएसएफचे अधिकारी मुकुल गोयल यांनी इंडियन एक्सप्रेसला दिली.

हसन अलीचा हा चिथावणीखोर व्हिडीओ क्रिकेटबाबत बातम्या देणारी वेबसाइट क्रिकइन्फोने शेअर केला आहे. पाकिस्तानचं वृत्तपत्र 'डॉन'हा व्हिडीओ आपल्या फेसबुक पेजवर शेअर केला असून मोठ्या प्रमाणात हा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

# पॉर्न पाहणाऱ्या मुलाचा आईवर बलात्कार

**अहमदाबाद (पीटीआय) -** मोबाईलमध्ये अश्लिल (पॉर्न) व्हिडिओ पाहण्याचं व्यसन जडलेल्या एका मुलानं आपल्या जन्मदात्या आईवर बलात्कार केला. ही संतापजनक घटना गुजरातमधील पालनपूरमध्ये उघडकीस आली. आरोपी मुलाला पोलिसांनी अटक केली आहे. गुजरातमधील पालनपूर येथे राहणाऱ्या या मुलाला मोबाईलमध्ये अश्लिल (पॉर्न) व्हिडिओ पाहण्याचं व्यसन जडलं होतं. तो रात्र-दिवस अश्लिल चित्रपट पाहायचा. घरात आई व बहिणीसमोरही तो चित्रपट पाहायचा. रात्री १ च्या सुमारास पाणी प्यायच्या बहाण्याने तो आईच्या खोलीत गेला. आई झोपल्याचं पाहून त्यानं तिच्यावर बलात्कार केला. मुलाच्या या कृतीनं आईला प्रचंड धक्का बसला. सकाळी उठल्यावर तिनं कामानिमित्त बाहेर असलेल्या पतीला फोन करून घडलेला सर्व प्रकार सांगितला. अहमदाबादला असलेल्या मोठ्या मुलाला सांगून त्याच्याविरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्याचा सल्ला पतीनं दिल्यानंतर आरोपी मुलाविरुद्ध गुन्हा नोंदवला असून त्याला अटक केली आहे.

# शिक्षकी पेशाला बदनाम करणारी घटना तरुणीचा केला जबरदस्तीने विवाह

**पिंपरी (पुणे) (अभिजीत येरल्लु)-** एका १९ वर्षीय तरुणीचा ४६ वर्षीय व्यक्तीशी जबरदस्तीने विवाह लावण्यात आला. या प्रकरणी त्या तरूणीने आपल्या आई-वडिलांसह पंधरा जणांवर सांगवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

दिप्ती गायकवाड (वय १९, रा. जुनी सांगवी) या तरुणीने सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आई अनिता गायकवाड (वय ३६), वडील दयानंद गायकवाड (वय ४६), शामा मच्छिंद्र माने (वय ५४), मच्छिंद्र माने (वय ४६), रवी माने (वय २९) शामल रवी माने (वय २५ रा.पटेकर चाळ, ढोरगल्ली), रूपाली राहुल भांडळे (वय ३०), राहुल भांडळे (वय ३१,), उत्तम विठ्ठल काळे आणि इतर सहाजण अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी हे फिर्यादीचे आईवडील आहेत. फिर्यादी दिप्तीचे लग्न तिला न विचारता ठरवण्यात आले. ते त्यांना मान्य नव्हते. दीप्ती यांनी नवऱ्या मुलालाही पाहिलेले नव्हते. 'स्थळ आहे म्हणून तुला



लग्न करायचे आहे', असे सांगून दिप्ती यांना जबरदस्तीने गाडीत बसवुन तेरखेड येथे नेले. तिथे पती म्हणून उत्तम विठ्ठल माने यांना दाखविले. 'नवरा मुलगा पप्पा पेक्षाही मोठा दिसतो व त्याचे पहिले लग्न झाले आहे. त्यास चौदा वर्षांची मुलगी देखील आहे त्यामुळे आपण तिच्याशी लग्न करणार नाही,' असे दिप्तीने आपल्या पालकांना स्पष्ट शब्दात सांगितले.

त्यावेळी एका आरोपीने 'तो तुझ्या आई वडिलांना पुण्यामध्ये फ्रॅट घेऊन देणार आहे. तसेच तो शिक्षक असल्याने कर्जही फेडणार आहे. तू लग्नास नकार दिल्यास तुला बघून घेईल,' अशी धमकी दिली, मला मुलगा पाहिजे यासाठी तुझ्यासोबत लग्न करणार आहे,' असे नवऱ्या मुलाने सांगितले. २२ मार्च २०१८ रोजी दीप्ती यांना आळंदी येथे जबरदस्तीने नेऊन लग्न लावून दिले. २० एप्रिलला दीप्ती यांनी सांगवी पोलिसांना फोन करून याबाबत माहिती दिल्यावर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. महिला पोलीस उपनिरीक्षक शिंदे याबाबत अधिक तपास करीत आहेत.

# जगातील ७० कोटी कामगार दारिद्र्यात

**न्यूयॉर्क (वृत्तसंस्था)-** विकसनशील आणि नव्याने उदयाला येणाऱ्या देशांतील ७० कोटी कामगार आजही दारिद्र्यात राहात आहेत. या कामगारांचे दैनंदिन उत्पन्न ३.१० डॉलरच्या निकषापेक्षा कमी असल्याचे आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने म्हटले आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीबरोबरील वार्षिक बैठकीमध्ये आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे महासंचालक गाय रायडर यांनी ही माहिती दिली. 'अर्थव्यवस्थांची पुनर्बांधणी होत असताना, २०१७ ते २०१९ या तीन वर्षांच्या काळामध्ये रोजगारनिर्मितीचे प्रमाण वाढले असून, बेरोजगारीचा जागतिक दरही कमी होणे अपेक्षित आहे. मात्र, विविध देशांच्या समूहांचा विचार करता, कामगारांच्या दृष्टीने होणारी प्रगती समान वेगाने होताना




दिसत नाही. विकसनशील आणि नव्याने उदयाला येणाऱ्या देशांमध्ये बेरोजगारांच्या प्रमाणामध्ये होणारी वाढ कायम आहे,' असे रायडर यांनी सांगितले. जगात २०१७ या वर्षात लक्षणीय प्रगती झाल्यानंतरही, ७० कोटी कामगार दारिद्र्यामध्ये राहात आहेत. विकासाचा वेग कमी झाला असून, वाढत्या कामगार संख्येच्या प्रमाणामध्ये विकासाचा वेग राखण्यामध्ये अनेक विकसनशील देशांना अपयश आले आहे.

# मानसिक आजारांना तूर्तास विमा संरक्षण नाही!

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)-मानसिक आजाराने ग्रस्त रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून एकट्या भारतात सात कोटी मनोरुग्ण आहेत. प्रदीर्घ काळ चालणाऱ्या या उपचारासाठी लागणारा खर्च कुटुंबाच्या आवाक्याबाहेर जात असतानाही विमा कंपन्यांनी या आजाराला विमासंरक्षण नाकारले आहे. मनोविकारावरील कुठल्याही उपचारांना विमा संरक्षण नाही, असे एका वाक्यात उत्तर देऊन विमा कंपन्या हात वर करीत आहेत. मानसिक आरोग्य विधेयक येऊनही अद्याप विमा कंपन्यांनी रस दाखविलेला नाही. भरमसाठ अतिरिक्त प्रीमिअम आकारण्याच्या तयारीत विमा कंपन्या आहेत.**



मानसिक आजारानी ग्रस्त रुग्णांमध्ये प्रामुख्याने नैराश्य, चिंता आदी विकार आढळत आहेत. स्किझोफ्रेनिया, बायपोलर, ओसीडी या विकारांनी ग्रस्त रुग्मांची मानसोपचार तज्ज्ञांकडे गर्दी वाढत आहे. आत्महत्येचे विचार सतत घोळत असणाऱ्या यातील अनेक रुग्णांवर इलेक्ट्रोकन्वल्सिव्ह थेरपी (ईसीटी) म्हणजेच शॉक ट्रीटमेंट हा एक प्रभावी उपचार आहे. याशिवाय रिपिटिटिव्ह ट्रान्सक्रॅनिअल मॅग्नेटिक (आरटीएमएस) तसेच थीटा बर्स्ट आदी उपचार उपलब्ध आहेत. मात्र हे सर्व उपचार खर्चिक आहेत. ईसीटीच्या ११ उपचारसत्रांसाठी (सिटिंग्जसाठी) ६० ते ७० हजार रुपये खर्च येतो तर आरटीएमएसची किमान २० सत्रे घ्यावी लागतात. त्यासाठी किमान ७५ हजार रुपये खर्च आहे. मात्र हा खर्च मानसिक आजारांसाठी असल्याचे कारण पुढे करीत याबाबतचे दावे विमा कंपन्या मान्य करीत नाहीत. या उपचारासाठी आवश्यक असणारी यंत्रणाच महागडी असल्यामुळे रुग्णांकडून इतके शुल्क आकारावे लागते, याकडे मानसोपचार तज्ज्ञांनी लक्ष वेधले आहे.

देशाचा विचार करायचा झाला तर सात कोटींपैकी ३५ लाख रुग्णांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करावे लागते. परंतु देशात या उपचारांची सोय केवळ ४० रुग्णालयांत असून त्यात फक्त २६ हजार खाटा आहेत, याकडेही एका मानसोपचार तज्ज्ञाने लक्ष वेधले. सरकारी रुग्णालयातील परिस्थिती फारशी आशादायक नाही. मुळात मानसिक आजार लपविण्याची वृत्ती असल्यामुळे खासगी उपचार घेण्याकडेही मनोरुग्णांच्या आप्तांचा कल असतो.

एकीकडे कर्करोग, हृदयरोगासह बहुतांश सर्वच रोगांना विमा संरक्षण आहे. मनोविकार हे मेंदूशी संबंधित आहेत आणि मेंदू हा शरीराचा भाग नाही का, असा सवार प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. संदीप जाधव यांनी केला. मानसिक आरोग्य कायद्यात विमा संरक्षणाबाबत अगदी पुसटसा उल्लेख आहे. प्रत्यक्षात मनोरोग एखाद्याचे आर्थिक गणित जितके बिघडवतो तेवढा अन्य कुठलाही आजार नाही. त्यामुळे मानसिक आजारांना विमासंरक्षण आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

# लातुरात संस्थाचालकाच्या जाचाला कंटाळून शिक्षकाची आत्महत्या

**लातूर (प्रतिनिधी)-** संस्थाचालकाच्या जाचाला कंटाळून शिक्षकाने आत्महत्या केल्याची घटना लातूर जिल्ह्यातील उदगीरमध्ये घडली. आत्महत्या करण्यापूर्वी या शिक्षकाने आपल्याला वैयक्तिक त्रास होत असल्याचं चिठ्ठीत नमूद केलं. तर शिक्षकाच्या नातेवाईकांनी संस्थाचालक शिक्षकाचा छळ करत असल्याचा आरोप केला.उदगीर शहराजवळच्या तुकाराम नाईक प्राथमिक विद्यालयात केशव जाधव हे कार्यरत होते. संस्थाचालकाने त्यांच्याकडे असलेला मुख्याध्यापक पदाचा कार्यभार काढून घेतल्यापासून ते नाराज होते. तर स्कूल बसचं भाडं देण्यासाठी संस्थाचालकाने केशव जाधव यांचा पगारही कापून घेतला, त्यामुळे ते तणावाखाली होते, असा आरोप जाधव यांच्या पत्नीने केला.केशव यांनी गुरुवारी सकाळी शाळेत जाऊन कार्यालयाच्या खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केली.नातेवाईकांनी अद्याप पोलिसात संस्थाचालकाच्या विरोधत तक्रार दिलेली नाही.

# पुण्यातील आयपीएल प्लेऑफ सामने लखनौला हलवणार?

**मुंबई (विशाल कारंडे)-** चेन्नईत कावेरी पाणीवाटपाच्या मुद्द्यावरुन होत असलेल्या विरोधामुळे, चेन्नई सुपरकिंग्जला पुण्याचं गहुंजे स्टेडिअम होम ग्राऊंड म्हणून देण्यात आलं.



महेंद्रसिंह धोनीचा संघ खेळणार पुण्यात खेळणार असल्यामुळे चाहते खुश होते, मात्र या आनंदावर विरजण पडण्याची शक्यता आहे. पुण्यात होणारे आयपीएल प्लेऑफचे सामने लखनौच्या मैदानावर हलवण्याची शक्यता आहे. चेन्नई सुपरकिंग्जचे सामने सध्या पुण्यात होणार आहेत. मात्र २३ आणि २५ मे रोजी होणारे प्लेऑफ सामने इतर ठिकाणी हालवण्याच्या ठिकाणी सुरु आहेत.''पुण्याच्या मैदानापेक्षा लखनौच्या मैदानाची प्रेक्षकसंख्या जास्त आहे. अंदाजे ५० हजार प्रेक्षक लखनौच्या मैदानात सामना पाहू शकतात. मात्र याबाबत अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. मैदानाची चाचपणी करुन अंतिम निर्णय घेतला जाईल,'' असं बीसीसीआयमधील सूत्रांनी म्हटलं आहे.लखनौसोबत राजकोट आणि कोलकाता या दोन ठिकाणीही प्लेऑफचे सामने हलवले जाऊ शकतात.

